Vol 6 Issue 10 April 2017 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN: 2231-5063 IMPACT FACTOR : 4.6052(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 10 | APRIL - 2017

GRT GOLDEN RESEARCH THOUGHTS

# ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासामध्ये ग्रामपंचायतींची भूमिका : एक अभ्यास

प्रा.डॉ.साळवे जगन्नाथ मोतीराम
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, मु.सा. काकडे महाविद्यालय,सोमेश्वरनगर.बारामती.

## प्रस्तावना

भारत देश हा खेडयांचा देश आहे. भारतामध्ये सर्वाधीक खेडी वसलेली आहेत. अर्ध्या पेक्षा जास्त लोकसंख्या भारतात ग्रामीण भागात वास्तव्य करत आहे. खेडयांच्या प्रगतीपतावर संपूर्ण भारताची प्रगती किंवा विकास अवलंबून आहे. मानसाला जीवन जगण्यासाठी लागणा-या मुलभूत गरजांची पुर्तता ग्रामीण गावांच्या माध्यमातून पुर्ण होत असतात. शेती हा मानसाच्या जगण्याचा सर्वात महत्वाचा घटक असून सर्वाधीक भारताची लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. शेतकरी समाज हा मोठया प्रमाणावर ग्रामीण भागात वास्तव्य करीत आहे. "खेडी नष्ट झाल्यास संपूर्ण भारत नष्ट होईल" असे महात्मा गांधी यांनी म्हटले आहे. शासनाच्या प्रत्येक स्तरावर जनतेचा जास्तीत जास्त सहभाग असावा व स्वत:वर शासन करण्याची जबाबदारी स्वता:च घ्यावी ही धारणा समोर ठेवून लोकशाही सुदृढ करण्याची काळजी घटनेमध्ये घेतली आहे. म्हणजेच भारताच्या विकासासाठी पंचायतराज व्यवस्था हे म्हत्वाचे साधन आहे. संसदेला देशाच्या दृष्टीने जेवढे महत्वाचे स्थान आहे. तेवढेच स्थान ग्रामीण भागात ग्रमपंचायतीला देखील आहे.



## ग्रामपंचायतीचा इतिहास

भारत देश हा खेडयांचा व गावांचा देश आहे. प्रत्येक गावामध्ये किंवा खेडयामध्ये खेडे विकास व गाव विकासासाठी ग्रमपंचायती आहेत.त्यांचा इतिहास पहाणे आवश्यक आहे.ग्रामपंचायतीचा इतिहास फार प्राचीन आहे.प्राचीन काळी गावातील लोकांची आपआपसातील भांडणे,वाद,तंटे सोडवण्याचे काम ग्रामपंचायतीच्या माध्यमातून पाहीले जात होते.परंतू ब्रिटीश सरकार भारतात आले आणि त्यांनी आपली सत्ता काबिज केली तेव्हापासून पंचायतीचे स्वरूप हळुहळु बदलत गेले व सर्व कामे प्रांतातील सरकारे करू लागली जेव्हा देशाला स्वतंत्र्य मिळाले तेव्हा घटकराज्य सरकारांनी भारतामध्ये पंचायतराज स्थापनेला प्राधान्य दिले त्यामुळे लोकशाही विकेंद्रीकरनाच्या प्रक्रीयेला वेग आला. भारतामध्ये पंचायतराज व्यवस्थेची संकल्पना महात्मा गांधीजींनी मांडली त्यांनी स्पष्ट केले की,प्रत्येक खेडे हे गणराज्य बनले पाहीजे म्हणजेच पंचायतींना सर्व अधिकार मिळावयास हवेत त्यांच्या मते "जास्तीत जास्त अधिकार म्हणजे जनतेचे जास्तीत जास्त हित होय." या तत्वानुसार पंचायतराज व्यवस्थेला प्रधान्य दिल्याचे दिसते.खरी लोकाशाही ग्रामीण भारतात आहे.

भारतामध्ये पंचायतराज व्यवस्था सुरू करण्याचे श्रेय पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना दिले जाते.राजस्थानमध्ये गांधी जयंतीच्या दिवशी नेहरू म्हणाले होते "गावातील लोकांना जास्तीत जास्त अधिकार दिले पाहिजेत त्यांच्याकडून हजार चुका झाल्या तरी चालतील पंचायतींना अधीकार द्या.सत्तेचे खरे शस्त्र त्यांना हाती घेऊ द्या.सन १९५२ साली सामुदायिक विकास कार्यक्रमाची मुहुर्तमेढ रोवली गेली व भारतामध्ये पंचायतराज्याची सुरवात झाली त्यामध्ये काही मुलभुत स्वरूपाचे दोष होते. ते म्हणजे कार्यक्रम पुर्ण पणे सरकारी अधिका-यांवर अवलंबून होता. सरकारी अधिकारी जनतेचा पुर्ण विश्वास संपादन करू शकले नाही तसेच राजकिय नेत्यांचा हस्तक्षेप होत होता. भारतामध्ये पंचायत राज्यांच्या राजकारणात अनेक चढ उतार येवून काळानुसार संशोधन करून तसेच समित्यांच्या शिफारशी स्वीकारून पंचायतराज्याचा कारभार जोमाने सुरू झाला व ग्रामीण भारतात विकासाच्या प्रकियेला गती मिळाली.

## महाराष्ट्रातील पंचायतराज

महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती अधिनियम १९६१ नुसार १मे १९६२ साली त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्था अस्तित्वात आली त्यानुसार ग्रामीण परिवर्तनाला गती मिळाली मोठया प्रमाणात जनतेला त्यामध्ये सामावून घेतल्यामुळे ग्रामीण परिवर्तनाला गती मिळाली व जनतेत नवचैतन्य निर्माण झाले. महाराष्ट्रातील पंचायतराज व्यवस्था ही मुख्यत: वसंतराव नाईक समितीच्या शिफारशीवर अधारित आहे.त्यानंतर व्यवस्थेतील दोष दुर करण्यासाठी विविध समित्या नेमल्या परंतू ७३ व्या घटना दुरूस्तीच्या माध्यमातून पंचायतराज व्यवस्थेत मुलभुत परिवर्तन घडून आले म्हणूनच राज्यातील पंचायतराज संरचनेला घटनात्मक दर्जा मिळाला. ग्रामपंचायत, पंचायात समिती व जिल्हा परिषद या स्थानिक शासनाच्या तिनही स्तरावर अनुसुचित जाती,जमाती आणि खुल्या सवर्गातील महीलांना ३३ टक्के आरक्षण मिळाले. महाराष्ट्रात सध्यस्थितीत महिलांना ५० टक्के आरक्षण आहे.

**ग्रामपंचायत :-** ग्रामपंचायत हा स्थानिक स्वराज्य संस्थेतील सवोत शेवटचा घटक असून ग्रामीण विकासातील हा अत्यंत महत्वपुर्ण घटक आहे म्हणुनच पंचायतराज व्यवस्था ही ग्रामपंचायतीच्या कार्यावर अवलंबून आहे.स्वातंज्यानंतर मुंबई प्रातात झालेल्या १९५८ च्या कायदयानुसार महाराष्ट्रात ग्रामपंचायची स्थापना झाली. ग्रामपंचायत स्थापन होण्यासाठी गावाची लोकसंख्या किमान ५०० असावी लागते सध्या महाराष्ट्रात २७ हजार ९०६ ग्रामपंचायती अस्तीत्वात आहेत.गावच्या लोकसंख्येच्या प्रमाणात ग्रामपंचायतीची सदस्य संख्या किमान ७ तर कामल १७ एवढी असते. सरपंच व उपसरपंच हे ग्रामपंचायतीचे पदाधिकारी असतात. सदस्य आपल्यातूनच त्यांची निवड करतात या पदांनाही ७३ व्या

घटनादुरूस्तीनुसार आरक्षीत करण्यात आलेले आहे . ग्रामसेवक हा त्या ग्रामपंचायतीचा सचिव असतो . दैनंदिन कामकाज तो पहात असतो . जमा-खर्च सभेचे इतिवृत इत्यादी कार्य तो पार पाडत असतो .

उद्दिष्टये :-

१) ग्रामीण भागाचा विकास साध्य करणे .
२) ग्रामपंचायतीच्या माध्यमातून ग्रामीण भागात होणा-या विकास कामांचा आढावा घेणे .
३)लोकशाही पध्दतीने ग्रामीण विकासात कामकाज चालवणे .
४)ग्रामपंचायतीच्या विकास कामातून रोजगारनिर्मीती .
५)ग्रामीण भागातील शैक्षणिक विकास साध्य करणे .
६) ग्रामपंचायतीच्या माध्यमातून कुटिरोद्योग,ग्रामोद्योग यांना उत्तेजन देणे .
७) ग्रामपंचायतीच्या माध्यमातून विकास कामांचा अभ्यास करणे .

महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींच्या माध्यमातून होणारी विकास कामे :- ग्रामपंचायतीच्या माध्यमातून सध्याच्या परिस्थितीत अनेक कामे केली जातात . ग्रामपंचायत ही स्थनिक पातळीवरील महत्वपुर्ण संस्था असून अनेक प्रकारची या संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागात केल्याचे निदर्शनास येते यामधील काही महत्वाची कामे पुढील प्रमाणे सांगता येतील .

१) ग्रामीण विकासासाठी सार्वजनिक स्वच्छता, सार्वजनिक स्वच्छतागृहे, जनावरांना पीण्याच्या पाण्याची सोय करणे .
२) सार्वजनिक स्थळांची देखरेख, रस्ते, दिवाबत्ती, गटारे, साफसफाई, वृक्षारोपन, क्रिडांगणे, बागा, धर्मशाळा, मंदिरे व शैक्षणिक विविध उपक्रम ग्रामपंचायतीच्या माध्यमातून केले जातात .
३) ग्रामीण भागाचा विकास व्हावा यासाठी बेघरांना वेगवेगळया योजनांच्या माध्यमातून घरे दिली जातात .
४) सध्य परिस्थितीमध्ये प्रत्येक घरासाठी शैचालय सक्तिचे केल्याने योजनांमधून शैचालये बांधून दिली जातात .
५) ग्रामीण भागाला आकार देणारे उपक्रम म्हणजे कुटिरोद्योग,ग्रामद्योग यांना उत्तेजन देऊन त्यासाठी आवश्यक ते पाठबळ ग्रामपंचायतीकडून मिळत असते .
६) ग्रामपंचायतींनी वृक्षारोपन मोहीम राबवून वृक्षसंवर्धन व वृक्षसंरक्षणाला प्राधान्य दिलेले आहे .
७) ग्रामीण भागातील व्यसनाधिनांच्या व मागास समाजाच्या उन्नतीसाठी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून दारूवंदी,अस्पृशता निर्मुलन, अपंगाना व निराधारांना मदत यासारखे समाजपयोगी उपक्रम राबविले जातात .
८) ग्रामपंचायतीच्या माध्यमातून पशुधनात सुधारणा करून शेतील जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसाय शेतकरी करीत असून गावाची अर्थव्यवस्था सुधारताना दिसते .
९) ग्रामपंचायतीच्या उपक्रमातून गावातील शेती सुधारणासाठी, शेतक-यांना खते, किटकनाशके, बी-बियाणे तसेच शेतक-यांची पडीक जमिन लागवडीखाली आणण्याचे प्रयत्न केले जातात .
१0) गावाच्या सुरक्षेसाठी ग्रामसुरक्षा दले, तंटामुक्ती समिती इ . प्रकारची कामेर्या ग्रामपंचायतीकडून केली जातात .
११) दैनिक कार्या सोबत काही नियमित कार्य ही ग्रामपंचायत चोखपणे पार पाडतात त्यामध्ये जन्म-मृत्यु, विवाह नोंदी, गावचा विकास आराखडा, आडवडा बाजार नियोजन, यात्रा नियोजन व नियंत्रण ही कार्य ग्रामपंचायत पार पाडत असल्याचे दिसते .
१२) ग्रामीण भागात स्मशानभुमिची निर्मिती व देखभाल करण्याचे काम ग्रामपंचायत करते .
१३) गावातील सांडपाणी व कच-याची विल्हेवाट लावण्याचे कामही ग्रामपंच
१४) ग्रामीण विकासाचा विचार करता, पाणी पुरवठा व रस्त्यांची सुविध ही महत्वाची कामे ग्रामपंचायत करत असल्याचे दिसते .
१५) संजय गांधी निराधार योजना, श्रावनबाळ योजना, इदिरागांधी निराधार योजनांचा लाभ गावातील निराधार लोकांना मिळवून देण्याचे कामही ग्रामपंचायतीच्या माध्यमातून केले जातात .

अशा प्रकारची विविध कामे ग्रामपंचायतीच्या माध्यमातून केली जातात . म्हणूनच सध्य परिस्थितीत भारतातील व महाराष्ट्रातील खेडयांची सुधारणा होत चालल्याचे दिसते आज प्रत्येक गाव/खेडे सुधारलेले दिसते . गावामध्ये विविध प्रकारच्या सुधारणा झालेल्या दिसत आहेत म्हणूनच ग्रामपंचायतींचा अभ्यास करणे उचीत आहे .

देशातील संसदेप्रमाणे गावात ग्रामसभा कार्य करते . सभेची तरतुद ७३ व्या घटना दुरूस्तीनुसार केले आहे . ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात १८ वर्षावरील सर्व नागरिक तीचे सदस्य असतात तसेच ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत सर्व नागरिकांना आपले मत मांडण्याचा अधिकार असतो . ग्रामसभेची बैठक किमान चार वेळा घेणे बंधनकारक आहे . विकासासाठी विविध समित्या ग्रामसभेत निवडल्या जातात शासनाकडून दिल्या जाणा-या आर्थिक मदतीचा लाभ गावातील कोणत्या व्यक्तीला द्यावयाचा ती निवड ग्रामसभा करते . ग्रामसभेत जनतेला ग्रामपंचायतीच्या सदस्यांना विविध प्रश्न विचारण्याचा अधिकार असतो .

ग्रामपंचायतींना येणा-या समस्या :-

१) वित्तीय साधनांची समस्या- स्थानिक संस्थांसमोर अनेक अव्हाने असून त्यात प्रामुख आव्हाने हे वित्तीय साधनांचे आहे . या संस्थांवर सोपविलेली कामे आणि लागणारा निधी हा अपूरा असतो . राज्यशासनाच्या मदतीवरच त्यांना मोठया प्रमाणावर अवलंवून रहावे लागते . या अर्थिक परावलंबनामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांची स्थिती अतिशय विकट झाल्याचे दिसते .
२) कर वसूलीत अडचणी-ग्रामपंचायत पाणी पट्टी कर,घरपट्टी,दिवात्ती कर,आरोग्य कर गावातील नागरिकांकडून आकारत असते हा कर वार्षातून एकदाच भरावा लागतो परंतू ग्रामीण भागातील लोकांची आर्थिक परिस्थिती हालाकीची असल्याने असे कर ते ग्रामपंचातील वळेवर देत नाहीत . ही एक मोठी अडचण निर्माण होते .
३) उत्पन्नाची अपुरी साधाने- ग्रामपंचायतीला घरट्टी,पाणिपट्टी,विज,दिवाबत्ती असे कर मिळतात . ही साधने अपुरी आहेत .
४) केंद्रशासनाचे दुर्लक्ष- ग्रामीण भागामध्ये ग्रामीण विकासासाठी ग्रामपंचायत सज्ज असतात परंतु केंद्रशासनाचा निधी ग्रामीण भागाकडे येत नाही . शहरीकरणासाठी केंद्रसरकारचा पुढाकार असतो . म्हणुनच असे वाटते की ग्रामीण भागाकडे केंद्रसरकारने केले आहे . तसेच मिळणा-या निधीचा अभाव असतो .
५) राज्यसरकारचे कठोर नियंत्रण-राज्यशासनाकडून ग्रामपंचायतींना मदत होत असते . काही प्रमाणात ग्रामपंचायतींना निधी पुरवला जातो परंतू ग्रामपंचायतीवर राज्यशासनाचे कठोर नियंत्रण असल्याचे दिसते .

## निष्कर्ष-

गावाच्या विकासामध्ये ग्रमपंचायतींना महत्वाचे स्थान आहे . केवळ अर्थिक विकास होणे म्हणजे खरा विकास नसून गावातील मुलभुत प्रश्नांची सोडवणुक होणे गरजेचे असते . अधुनिक काळात शहरिकरणाचे प्रमाण वाढत आहे . देशातील सवेच गरजा शहरिकरणाच्या माध्यमातून पुर्ण होत नाही त्यासाठी गावाच्या विकासाकडे शासनाने लक्ष देणे गरजेचे आहे .

१) ग्रामपंचायतीच्या महात्मा गांधी तंटामुक्ती समितीच्या माध्यमातून गावातील वादग्रस्त तंटे गावातच मिटत आहेत .
२) संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत अनेक गावांनी कात टाकली आहे .
३) ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेच्या माध्यमातून गावामध्ये विविध कुटीरोद्योग व बचत गटांची स्थापना झाली त्यातून आर्थिक सक्षमिकरणाला बळकटी मिळाल्याचे दिसते .
४) ग्रामसभेतील प्रभावी निर्णयामुळे गावातीळा गरजुंना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळण्यास अडचणी कमी झाल्याचे दिसते .
५) वाढत्या शिक्षण प्रसारामुळे गावामधील साक्षरतेचे प्रमाण वाढताना दिसते ग्रामीण लोक पारंपरिकतेला धरून न बसता अधुनिकतेची कास धरत आहे .
६) शिक्षण आणि विज्ञान तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रसारामुळे शेती विषयक अनेक प्रयोग होताना दिसतात .

## संदर्भ सुची-

१) वराडकर र . हा -भारतातील शासन आणि राजकारण,निराली प्रकाशन पुणे- २०१३
२) वाईकर अनंत,- भारतीय शासन संस्था आणि राजकारण, निराली प्रकाशन पुणे- २००४
३)कांबळे बाळ,खांदवे एकनाथ-भारतीय लोकशाही समोरील आव्हाने, डायमंड पब्लीकेशन्स, पुणे- २०१२
४) वराडकर र . हा , राशिनकर नंदा- महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य् संस्था, निराली प्रकाशन-२०१५
५) Government of IndiaÁ1957 a Proceedings of the third meeting of the Central Council of Local Self Government Srinagar 1957.
६) Government of IndiaÁ1978 Ministry of Agriculture, Report of the committee on Panchayati Raj Institution, (Ashok Mehta Committee) New Delhi.
७) Datta, Bisakha (ed)1997Á And who will make the chapattis? A Study of All Women panchayats in Maharashtra.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org